**श्री संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन ता. भातुकली, जि. अमरावती या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयांतील कामास निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: तीर्थवि-२०२६/ई-१५७०२५४/यो-११**
**बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१**
**दिनांक : ०२ मार्च, २०२६**

वाचा:-

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक: तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/१४४४,दि.४ जून २०१५.
२)ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांकः तिर्थवि-२०१८/प्र.क्र.२०९/यो-६, दि. १४.०२.२०१९
३) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांकः तिर्थवि-२०१९/प्र.क्र.११८/यो-६, दि. ३१.०७.२०१९.
४) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांकः तिर्थवि-२०२१/प्र.क्र.१५७ (भाग-१)/यो-६, दि. ०१.१२.२०२२.
५) कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, दर्यापूर, जि. अमरावती यांचे पत्र जा.क्र. २८५३/अर्थ/२०२५ दि.०८.०९.२०२५

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र. २ अन्वये श्री संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन, ता. भातुकली, जि. अमरावती या तीर्थक्षेत्राच्या **रु. १०,३६,३१,०००/- (रुपये दहा कोटी छत्तीस लक्ष एकतीस हजार फक्त**) इतक्या रकमेच्या विकास आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ अन्वये रू.२,०३,००,०००/- (**रुपये दोन कोटी तीन लक्ष फक्त**) इतका व संदर्भ क्र.४ अन्वये रु.४,०७,००,०००/- (**रुपये चार कोटी सात लक्ष फक्त**) इतका असा एकूण रु.६,१०,००,०००/- **(रुपये सहा कोटी दहा लक्ष फक्त**) निधी वितरीत करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ५ अन्वये कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, दर्यापूर, जि. अमरावती यांच्याकडून उर्वरित निधी मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार सदर तीर्थक्षेत्रासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत तरतुदीतून, श्री संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन ता. भातुकली, जि. अमरावती या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयांतील कामांस **रु.४,०६,३१,००० /- (रु.चार कोटी सहा लक्ष एकतीस हजार फक्त)** इतका निधी कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, दर्यापूर, जि. अमरावती यांना वितरीत करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, दर्यापूर, जि. अमरावती यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामावरच सदर निधी खर्च करावा. तसेच संदर्भाधीन शासन निर्णय क्र. २ मधील मंजूर कामे पूर्ण करण्याकरिता शासन उक्त निधी वितरीत करीत आहे. सबब, सदर निधी संबधित कार्यान्वयिन यंत्रणेला वितरीत करताना व प्रत्यक्ष खर्च करताना तसेच सदर कामे पूर्ण करताना उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय क्र. २ मध्ये नमूद अटी-शर्ती व त्यामध्ये दिलेले संबंधित निदेश व प्रचलित नियम लागू राहतील.

३. मंजूर निधीचा योग्य विनियोग होण्यासाठी व कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही या दृष्टीने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दक्षता घ्यावी. सदर कामांचा त्यांनी वेळोवेळी आढावा घेऊन कामावर देखरेख ठेवावी व कामांचा भौतिक प्रगती अहवाल व खर्चाची माहिती विहित मुदतीत सादर करावी. तसेच, कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, दर्यापूर, जि. अमरावती यांनी या योजनेकरिता झालेल्या/होणाऱ्या खर्चाचा आढावा घेऊन महालेखापाल कार्यालयातील खर्चाचा ताळमेळ घेऊन त्यामध्ये तफावत राहणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी व सदर निधी आवश्यक बाबींवर खर्च झाला असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करावे.

४. राज्य शासनामार्फत वेळावेळी प्रस्तुत योजनेविषयी व वित्त विषयक वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश/नियम/शासननिर्णय/वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करून वरील वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर कामांचे नियोजन व खर्चाचे सनियंत्रण, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क.६/१४४४, दिनांक ४ जून २०१५ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीकडे सोपविण्यात येत आहे. समितीची कार्यकक्षा शासन निर्णयात नमूद केल्यानुसार राहिल.

६. या विभागाच्या शासन निर्णय दि.१६/११/२०१२ नुसार पशूहत्त्या व अंधश्रद्धा वाढीला प्रोत्साहन देणाऱ्या तीर्थक्षेत्रांना निधी वितरीत केला जाणार नाही, अशी स्पष्ट तरतूद आहे. त्यामुळे या तीर्थक्षेत्रस्थानी असे प्रकार होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी व असे प्रकार झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यास योग्य ती कार्यवाही केली जाईल व शासकीय अनुदान थांबविले जाईल.

७. उपरोक्त कामांवरील खर्च मागणी क्र.एल-०३ "२५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रम-१९६, जिल्हापरिषदांना / जिल्हास्तरीय पंचायतीना सहाय्य-(००)(०७) ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरीता रु.२.०० ते २५.०० कोटीपर्यंत अनुदान (२५१५ २५२१) (योजनांतर्गत) दत्तमत ३१-

सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या मान्यतेने व वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र.३२२/२०२५/व्यय-१५ दि. २९.०४.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे. तसेच, सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र: अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि. ०७ एप्रिल, २०२५ अन्वये अटींची व शर्तीचे पालन करून निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३०२१३११४७१५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

SAGAR SURESH MANORE

Digitally signed by SAGAR SURESH MANORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RDD, 2.5.4.20=1D70DF32CC6C50DE99C87FB7AFB9A7374B4BAF59A5F2BD0E66326738EF12B208, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=588F78CC5AE9E0365D3D59EE429924872845ADC4FC8F9F4A3526F4FE39804D78, cn=SAGAR SURESH MANORE
Date: 2026.03.02 16:02:56 +05'30'

**(सागर मनोरे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१,मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
९. विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती,
१०.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती,
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती,
१२.कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, दर्यापूर, जि. अमरावती,
१३.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती,
१४.जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती,
१५.अवर सचिव, नियोजन विभाग, (का-१४४४) मंत्रालय, मुंबई-३२,
१६.अवर सचिव, वित्त विभाग (व्यय १५,अर्थसं १६,अर्थसं १७) मंत्रालय, मुंबई ३२,
१७.कक्ष अधिकारी, कार्या- वित्त-१, ग्राम विकास विभाग,
१८. निवड नस्ती योजना-११.